महाराष्ट्र शासन

## (ग्राम विकास विभाग)

### जिल्हा परिषद, वाशिम अंतर्गत गट–क मधील सरळसेवेची रिक्त पदे भरण्यासाठीची जाहिरात पदभरती सन २०१९ जाहिर आवाहन जि.प. वा/ साप्रवि/आस्था–१/१६४९/२०१९ दिनांक :- १८/४/२०१९

या कार्यालयाद्वारे जिल्हा परिषद, वाशिम अंतर्गत गट क या संवर्गातील रिक्त पदे ऑनलाईन पद्धतीने भरण्याकरिता जाहीरात दैनिक विदर्भ मतदार, मातृभूमी या मराठी वृत्तपत्रामध्ये तसेच जिल्हा परिषदेच्या www.zpwashim.in व शासनाच्या www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २ मार्च २०१९ ला प्रसिद्ध करण्यात आली असून दिनांक १७/०४/१९ रोजी प्रसिद्ध केलेल्या शुद्धीपत्रकानुसार त्यामध्ये सर्व पदाकरीता ऑनलाईन अर्ज भरण्याचा दिनांक २३/०४/२०१९ पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आली आहे.

तथापी सद्यःस्थितीत अनेक विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज भरलेले असून फी भरण्याचा वेग लक्षणीय मंदावलेला असल्याने शासनाचे निदर्शनास आले आहे.

करीता ज्या उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरण्याकरीता नोंदणी केली आहे तथापी अर्जावरील फी ची रक्कम भरलेली नाही अशा उमेदवारांनी अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकाची वाट न पाहता लवकरात लवकर फी ची रक्कम भरणा करणे बाबत जिल्हा परिषद वाशिम कडून आवाहन करण्यात येत आहे. या बाबत सर्व अर्ज भरणाऱ्या उमेदवारांनी नोंद घेवून फी भरणा तात्काळ करण्याबाबत दक्षता घ्यावी.

सही/-
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा)
जिल्हा परिषद, वाशिम

(दिपक कुमार मीना, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, वाशिम

Publish on News Paper

दै. भास्कर 2 0 APR 20

# उम्मीदवारों से परीक्षा शुल्क भरने की अपील

वाशिम | वाशिम जिला परिषद अंतर्गत गुट क संवर्ग के रिक्त पद आनलाइन पद्धति से भरने के लिए विज्ञापन जिला परिषद के डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू.झेडपीवाशिम.इन व डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू.महापरीक्षा.जीओवी.इन वेबसाईट पर 2 मार्च 2019 को प्रसिद्ध की गई है । जिसके बाद 17 अप्रैल 2019 को प्रसिद्ध हुए शुद्धिपत्रक के अनुसार सभी पदों के लिए आनलाइन आवेदन भरने के लिए 23 अप्रैल 2019 तक समयावधि दी गई है । वर्तमान स्थिति में आनलाइन आवेदन भरनेवाले अनेक उम्मीदवारों को भी अब तक अपना परीक्षा शुल्क नहीं भरा है और परीक्षा शुल्क भरने की गति मंद पड़ गई है । जिन उम्मीदवारों ने पदभरती के लिए इससे पूर्व ही आनलाइन आवेदन भरे है वे अंतिम तिथि की राह ना तकते हुए परीक्षा शुल्क की राशि शीघ्र से शीघ्र भरने की अपील वाशिम जिला परिषद के मुख्य कार्यकारी अधिकारी दीपक कुमार मीना व उप मुख्य कार्यकारी अधिकारी नितीन मोहुर्ले ने किया है ।

2 0 APR 2019

# वाशीम जिल्हा परिषदेत १८२ पदांसाठी भरती

## २३ एप्रिलपर्यंत करता येणार ऑनलाईन अर्ज

वाशीम/प्रतिनिधी

वाशीम जिल्हा परिषदेमध्ये विविध संवर्गातील रिक्त १८२ पदे भरली जाणार असून, त्यासाठी पदभरती सुरू झाली आहे. अर्जापासून कुणीही वंचित राहू नये म्हणून ऑनलाइन अर्ज भरण्यासाठी २३ एप्रिलपर्यंत मुदतवाढ मिळाली आहे. पात्र उमेदवारांनी विहित मुदतीत ऑनलाईन अर्ज सादर करावे, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी दीपक कुमार मीना यांनी केले.

जिल्हा परिषदांमधील रिक्त पदांचा भरणा करण्यासाठी यावर्षी प्रथमच ऑनलाईन पद्धतीने भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. २६ मार्चपासून ऑनलाइन अर्ज भरण्याला सुरूवात झाल्यानंतर १६ एप्रिल ही अर्ज भरण्याची अंतिम मुदत होती. विहित मुदतीत अर्ज सादर करण्यात अडचणी आल्याने अनेक पात्र उमेदवार अर्ज प्रक्रियेपासून वंचित होते. कुणावरही अन्याय होऊ नये म्हणून अर्ज प्रक्रियेला मुदतवाढ देण्यात आली आहे.



आता २३ एप्रिल रोजी उमेदवारांना ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करता येणार आहेत. वाशिम जिल्हा परिषदमध्ये कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) बांधकाम विभाग, ग्रामीण पाणीपुरवठा, लघुसिंचन व यांत्रिकी विभाग, कंत्राटी ग्रामसेवक, औषध निर्माता, वरिष्ठ सहायक (लेखा), आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, अंगणवाडी पर्यवेक्षिका, विस्तार अधिकारी (कृषी), विस्तार अधिकारी (पंचायत), पशुधन पर्यवेक्षक, कनिष्ठ लेखाधिकारी, स्थापत्य अभियांत्रिकी सहायक आदी विविध प्रकारच्या एकूण १८२ पदांकरीता ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले आहेत. ही मुदतवाढ अंतिम राहणार असून, यानंतर कोणतीही मुतदवाढ दिली जाणार नही. त्यामुळे पात्र उमेदवारांनी विहित मुदतीत ऑनलाईन अर्ज सादर करावे, असे आवाहन जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी दीपक कुमार मीना यांनी केले